International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.8
Volume 5, Issue 4, Oct-Dec 2025 ID: IJCRTA000214 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# मानवी जीवनात समतेची आवश्यकता

**डॉ.सुभाष एच पवार & प्रवीण शामराव तायडे**

**लेखक सलंग्निकरण:**
मार्गदर्शक, हिन्दी विभाग प्रमुख, संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी जि.जालना.
संशोधक, पालि ॲड बुध्दिझम विभाग, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर.

**लेख संदर्भ:** पवार, एस, एच., & तायडे, पी. एस. (2025). मानवी जीवनात समतेची आवश्यकता. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 5 (5), pg. 10-15. ijcrta.org

**DOI: 10.5281/zenodo.17713773**

**प्रस्तावना:**

समाजात अनेक मूल्य आहेत जी माणसाचे मानवी जीवन घडविण्याचे काम करते. त्यातील महत्त्वाचे मूल्य म्हणजे समता.समाजाचे परिवर्तन समता या मूल्य आधारे केले जाते.समता म्हणजे कोणत्याही व्यक्तीला त्याच्या जात,वर्ण,लिंग यावरून त्याचे अधिकार न ठरवता त्याला माणूस म्हणून त्याची मूलभूत अधिकार देणे म्हणजे समता.कारण '**समता हा मानव अधिकाराचा महत्त्वाचा घटक आहे'**.समता ही सामाजिक संकल्पना असून ती एक मानसिक व नैतिक मूल्य सुद्धा आहे.असे तथागत गौतम बुद्धांनी म्हटलेले आहे.मानवी समाजाचा पाया समता या मूल्यावर आधारित आहे. समतेशिवाय शिवाय न्याय नाही आणि शांतता सुद्धा नाही.समता असेल तरच विकास शक्य आहे.समाजात विषमता ही मानवाच्या प्रगतीमध्ये मोठा अडथळा आहे म्हणूनच समता हा विचार राजकीय आर्थिक नसून तो मानवाच्या नैतिकतेची संबंध ठेवतो.तथागत गौतम बुद्धांनी आपल्या उपदेशात स्पष्ट सांगितले आहे की,"**जन्म,वर्ण,लिंग यावरून माणूस श्रेष्ठ ठरीत नाही तर त्याच्या कर्मावरून माणूस श्रेष्ठ ठरविला जातो"**.म्हणून त्यांनी ऐके ठिकाणी आपल्या उपदेशात म्हटले कि,

**न जच्चा ब्राम्हणो होति न जच्चा होति अब्राह्मणो**
**कम्मना ब्राह्मणो होति कम्मना होति अब्राह्मणो** !१

**अर्थ** -जन्माने कोणी ब्राह्मण होत नाही व जन्माने कोणी अब्राह्मण होत नाही,तर कर्माने कोणी ब्राह्मण होतो व कर्मानेच कोणी अब्राह्मण होतो. वरील सुत्तावरुन आपणास स्पष्ट होते की,तथागतांनी केवळ कर्माला महत्त्व दिले.जन्म,वर्ण,लिंग याला नाही.त्यांच्या या उपदेशातून समतेचा भाव पहावयास मिळतो.आजच्या लोकशाहीमध्ये समता हे मूल्य फार महत्त्वाचे आहे.लोकशाहीने समता मूल्य स्वीकारले आहे.त्याचप्रमाणे भारतीय संविधानाने सुद्धा समता हे तत्व मानवाच्या हिताचे प्रमुख तत्व आहे.हे मान्य केले आहे. त्यामुळे समतेचा विचार धार्मिक नसून तो सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी आवश्यक आहे.

**समतेचा अर्थ:**

समता ही मानव कल्याणाचे साधन आहे.समता या शब्दातच तिचा अर्थ सामावलेला आहे.समता म्हणजे **न्याय**.असा अर्थ अभिप्रेत आहे.तरी सुद्धा समतेचे विविध अर्थ आपण पाहू.समतेचा अर्थ '**सम** म्हणजे **समान होण्याचा भाव** होय'.२ समता म्हणजे 'सर्व मानव जन्मतःसमान मानून त्यांना **समान संधी** व **अधिकार** मिळवून देणे होय.'३ आपल्या समाज जीवनाला सन्मार्गावर आणण्याचा मार्ग म्हणजे समता होय.४ असे आधुनिक विचारवंतांनी सांगितले आहे. असे विविध अर्थ समतेविषयी करण्यात येतात.समता म्हणजे योग्य न्यायपूर्ण विभागणी.अर्थात एखादा बालक कुपोषित असेल,कमजोर असेल म्हणून त्याला जास्त आहार(अन्न) देऊन उपयोग नाही तर त्याला हवा असणारा सकस आहार देणे.म्हणजेच हवा तेवढा आहार देणे म्हणजे त्यांच्याशी न्यायाने वागणे समतेने वागणे असा अर्थ होतो.

**विषयाची पार्श्वभूमी:**

तथागत गौतम बुद्धांच्या काळात ब्राह्मणवादी विचारसरणीने समाजात असंतोष निर्माण केला.ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य आणि शूद्र अशी समाज रचना तयार केली.ब्राह्मण हे श्रेष्ठ तर इतर सर्व खालचे वर्ग कनिष्ठ ही व्यवस्था करून ठेवली.सर्व शिक्षणाचे,अध्ययनाचे,पूजा -पाठ,यज्ञ,होम हवन,धर्म अधिकार,स्वतःकडे ठेवले.त्यामुळे समाजात विषमता निर्माण झाली.समाजात जन्मावरून श्रेष्ठत्वाची संकल्पना रूढ झाली.या विषमते विरुद्ध तथागत गौतम बुद्धांनी आवाज उठविला व आपले क्रांतीचे पहिले पाऊल टाकले.या पार्श्वभूमीवर तथागतांनी जन्म आधारित भेद नाकारून कर्मावर समतेचे तत्त्वज्ञान मांडले आणि आपल्या भिक्खू संघाद्वारे समतेचे बिजारोपण केले. त्यामुळे समता हा विचार मानवी समाजाच्या विकासाशी खोलवर जोडला गेला.तथागतांनी म्हटले की,सर्वांना दुःखमुक्तीचा अधिकार आहे,सर्व प्राणी समान आहेत.अशा परिस्थितीत समतेचा विचार मानवमुक्तीचा एकमेव मार्ग ठरला.त्यामुळेच "**बुद्धकाळात समतेचा विचार धर्मापुर्ता नसून तो सामाजिक क्रांतीचे प्रतीक होते,फार मोठी ती क्रांती होती**."समोर चालून हीच क्रांती इतरांना प्रेरणा ठरली.सम्राट अशोक,राष्ट्रपिता ज्योतिबा फुले,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यासारख्या थोर महापुरुषावर समतेचा प्रभाव पडला आणि त्यांनी समोर चालून समतेला महत्त्व दिले.आणि समतेचा रथ समोर नेण्याचा प्रयत्न केला.

**समतेची संकल्पना:**

इतिहासात डोकावून बघितल्यास प्राचीन काळापासून समतेचा विचार दिसून येतो.समाजात जात,वंश,धर्म,लिंग या भेदामुळे विषमता वाढली.परिणामी त्यामधूनच समता हा विचार समोर आला.समता ही मानवी जीवनातील आवश्यक संकल्पना समजली जाते."**समाजातील सर्व घटकांना समान संधी व अधिकार देणे ही समितीची मूळ भावना आहे"**.पाली साहित्यात **समता** हा शब्द **समान भाव, उपेक्षा,मध्यम मार्ग** या संकल्पनाची जोडला गेला अर्थात तो त्या शब्दाची निगडित आहे.या संशोधनात समतेची गरज,मानवी जीवनात तिचे महत्त्व,विषमतेची कारणे व परिणाम याचा शोध केला गेला.तसेच आधुनिक समाजात समतेची गरज स्पष्ट करण्यात आली आहे.समता केवळ सामाजिक क्षेत्रापुरती नाही तर ती **नैतिक मूल्य** पण आहे.**प्रत्येक व्यक्तीवर "स्वाभिमानाचा,आत्मसन्मानाचा,मानवी प्रतिष्ठेचा आदर करणे ही समतेची कसोटी आहे.**"म्हणूनच समता ही **मानवाच्या अस्तित्वाची** मूळ संकल्पना आहे.

**मानवी जीवनात समतेचे महत्व:**

तथागत गौतम बुद्धांनी समतेला आपल्या धम्माचा महत्व पुर्ण आत्मा मानले.त्यांच्या मतानुसार समता म्हणजे '**सर्व जीवाप्रती समान दृष्टीकोन,समान सन्मान असणे,समान संधी असणे असा आहे**.'त्यांनी आपल्या धम्मात

जाती पातीला,लिंग भेदाला,वर्णव्यवस्था स्थान दिले नाही.त्यांनी सर्वांना एकसमान माणुन,सर्वांना समान संधी दिली.''**कोणी नीच,उच्च नाही, सर्व समान आहेत.ही त्यांची मुख्य शिकवण आहे"**.आपल्या शिकवणुकीनुसार करूणा,मैत्री,आणि उपेक्षा या तत्वावर आधारित समाजात समता स्थापन केली.या तत्वाचा उपयोग करून सुनीत सारख्या भंग्याला,अंगुलीमाल सारख्या डाकुला,वासेष्ट सारख्या ब्राह्मणाला,अजातशत्रु सारख्या राजाला,किस्सा गौतमी,सारख्या स्त्री ला,श्रीमंत असणार्या अनाथपिंडकाला,गर्विष्ठ असलेल्या आम्रपालीला,आपल्या भिक्खू संघात सामील करुन घेता आले.अशा भरपूर लोकांना सन्मार्गावर आणुन त्यांना आत्मसन्मानाने जगायला शिकवले.आत्मसन्मानाने जगायला शिकल्या नंतर त्यांचे उदगार पण तेवढेच महत्त्वाचे आहेत.सुनीत भंगी जेव्हा भिक्खू संघात सामील झाला आणि तथागतांनी सांगितलेल्या मार्गाने जावु लागला तेव्हा तो म्हणतो,

**नीचे कुलम्हि जातीहं,दलिद्दो अप्पभोजनो**
**हीनकम्मं ममं आसि,असोसि पुप्फछड्गको!**
**ततो कारुणिको सत्था,सब्बलोकानुकम्पको**
**एहि भिक्खू,ति मं आहं,हा मे आसुपसम्पदा! ५**

***अर्थ*** -मै गरीब भोजनरहीत जाति मैं पैदा हुआ! मेरा काम हिन था,मै कुडा करकट फेकता रहा!मै मनुष्यधारा घृणीत हो गया! तब सर्व लोकांनुम्पक कारुणिक सास्ता बुद्ध ने मुझसे कहा भिक्खू आओ,और इस प्रकार वही मेरी उपसंपदा हुई!

**रत्तिया पठमं यामं,पुब्बजातिमनुस्सारि!**
**रत्तिया मज्झिमं यामं,दिब्बचक्खू विसोधयि,**
**रत्तिया पच्छिमेयामे,तमोखन्धं पदोलयिं! ६**

***अर्थ*** -उस रात के पहले पहर मे पुर्व जीवन को याद किया !उस रात के दुसरे पहर मे अन्तरिक दृष्टी विशुध्द हो गई!उस रात के अंतिम पहर मैं अविद्या रूपी अन्धकार को नष्ट किया!

सुनीत भिक्खू संघात सामील झाल्यावर सुनीता ने मनातील अंधकार नष्ट करून सर्वोच्च असा आनंदाचा त्याने आस्वाद घेतला.त्या नंतर त्याने सहजपणे वरील उदगार काढले आणि तो संघात प्रतिष्ठेने राहु लागला. त्याचप्रमाणे अंगुलीमाल डाकु जो लोकांना मारुन त्याचे बोटे कापुन,त्याची माळ गळ्यात घालीत होता अशा गुन्हेगाराला तथागतांनी आपल्या समतेच्या मैत्री बलाने भिक्खू संघात समावुन घेतले.त्यानंतर तो भिक्खू संघात आत्मसन्मानाने जगु लागला.त्याच्या या वागण्यावर तत्कालीन राजा प्रसेनजिताने पुढील उदगार काढले,'**ज्याला काठीने किंवा तलवारीने मी जिंकू शकलो नाही परंतु काठी किंवा तलवार यांचा मुळीच उपयोग न करता तथागतांनी त्याला जिंकले.**'७ ही तथागत गौतम बुद्धांची अथांग करूणा आणि मैत्री होय.हा सर्व तथागतांच्या समतेचा प्रभावाच म्हणावा लागेल.

तथागतांनी आपल्या भिक्खू संघात स्त्रियांना प्रवेश देवुन जगासमोर समतेचा आदर्श ठेवला आहे.कारण स्त्रियांना चुल आणि मुल एवढंच तिचे जिवन होते तिला कोणत्याही प्रकारचा मानसन्मान नव्हता,शिक्षणाचा अधिकार नव्हता परंतु भिक्खू संघात त्यांना प्रवेश देऊन तिला उच्चपदी पाठवले.तिला सन्मानाने जगायला शिकवले.या संदर्भात महाप्रजापती गौतमी भिक्खूणी संघात सामील झाल्यावर तिने म्हटले आहे की,

**बुध्द वीर नमो त्यत्थु ,सब्बसत्तानमुत्तय !**
**यो न दुक्खा पमोचेसि,अञ्ञञ्च बहुक जन! ८**

**अर्थ** -हे बुद्ध,हे वीर,हे सर्वोत्तम प्राणी,तुम्हे नमस्कार! जिसने मुझे और अन्य बहुत से प्राणियो को दुक्ख हे मुक्त किया!

महाप्रजापती गौतमी ने आपल्या मनातील भावाना व्यक्त करून तथागताप्रती आदर भाव मानला.कारण त्यांनी स्त्रियांना भिक्खूणी संघात स्थान दिले होते.त्यामुळे त्या आत्मसन्मानाने जगु लागल्या आणि जीवनाचा परमोच्च आनंद घेऊन विमुक्तीला जाऊ लागल्या.करण हा सर्व तथागतांच्या समतेचा भाव होता.त्यांनी स्त्रि पुरुष असा कोणताही भेदभाव न ठेवता आपल्या करूणेने,मैत्रीने गरिब असो का श्रीमंत,धनी असो कि निरधनी,राजा असो कि ब्राह्मण,गुन्हेगार असो किंवा नीच जातीचा,प्रत्येक व्यक्तीला संघात स्थान दिले.ऐवढा मोठा आदर्श क्वचित जगाच्या पाठीवर पहायला मिळेल.भिक्खु आणि भिक्खूणी संघ हा जगासमोर एक समतेचा सर्वात मोठा असा आदर्श उभा ठेवला.

मानवी जीवनात समता ही किती आवश्यक आहे. हे वरील गोष्टीवरून लक्षात येते.जर समता नसेल तर समाजात विषमता वाढेल,अन्याय, अत्याचार,संघर्ष निर्माण होणार.त्यासाठीच समाजाला समतेची आवश्यकता आहे.पालि साहित्यात **करूणा,मुदिता,उपेक्षा** आणि **मैत्री** ही तत्वे समतेशी निगडीत आहेत.या चार गोष्टींना साहित्यात चार ब्रम्हविहार म्हटले गेले.या गोष्टीचा मानसाने अंतर्गत खोलवर विचार केला तर समतेचा विकास होतो.सर्व प्राणीमात्राविषयी दया भाव निर्माण होतो,त्यांच्या कडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलतो.सर्व प्राणी एकसमान आहेत ही वृत्ती तयार होते.हीच वृत्ती माणसातील **अहंकार, व्देष** यातुन मूक्त करते.मानवी जीवनात समतेचा विकास झाला तर आत्मसन्मान,बंधुता, न्याय आणि शांती या गुणांचा विकास होण्यास मदत होते.म्हणुनच समता ही मानवाच्या नैतिक उन्नतीचा पाया आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सुध्दा तथागत गौतम बुद्ध यांच्या समतेला महत्त्व दिले आणि तो समतेचा वारसा जोपासला.त्यासाठी त्यांनी राज्य घटनेद्वारे कलम 14 मध्ये समाविष्ट केले कि**,"भारताच्या प्रत्येक प्रदेशातील राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्याच्या बाबतीत समान किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारू शकत नाही"**.९

या तत्वाचे अंतिम उद्दिष्ट सामाजिक,आर्थिक न्याय प्रस्थापित करणे होय.**१०** या वरून हे स्पष्ट होते की,'**सामाजिक समता ही राष्ट्राची उन्नतीचे साधन आहे'**.लोकशाही यशस्वीकरीता समाजात समता असणे आवश्यक आहे.कारण समता हीच खरी लोकशाही आहे असे म्हणणे वावगे होणार नाही.जर लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करावी लागेल.त्यामुळे समतेचा विचार मानवी जीवनात केवळ तत्वज्ञान राहणार नाही तर ते विकासाची गुरुकिल्ली राहील.

**विषमतेची कारणे व परिणाम:**

भारतीय समाजाच्या इतिहासात विषमता हा विषय फार जुना आहे.प्राचीन इतिहास म्हटला की, बौद्ध धर्म आणि ब्राह्मण वर्ग यांच्या संघर्षाचा इतिहास आहे कारण ब्राह्मण शाही विषमता प्रस्थापित करणारी विचारधारा आहे तर बौद्ध धर्म हा समता प्रस्थापित करणारी विचारधारा आहे याविषयीचा सर्वात मोठा घटक म्हणजे जाती व्यवस्था.कारण जाती व्यवस्थेने जन्मावर आधारित उच्च-नीच भावनेची समाजात खोलदरी निर्माण केली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या

International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.8
Volume 5, Issue 4, Oct-Dec 2025 ID: IJCRTA000214 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

जाती विषयी म्हणतात,'**जातीने सामाजिक वृत्ती नष्ट केली आहे, जातीने सामाजिक दातृत्व भावनेचा नाश केला आहे.जातीने जनमत अशक्य केले आहे'** **११**.ते पुढे असेही म्हणतात, **जात ही एक जाणीव आहे. एक मानसिक अवस्था आहे. म्हणूनच जातीचा विध्वंस म्हणजे भौतिक अडथळांचा विध्वंस नव्हे. जाती विध्वंसाचा अर्थ जाणिवा मध्ये बदल असा आहे. जात वाईट असू शकले.**जात माणसाची माणसाची अमाणूस म्हणावे अशी पशुतुल्य वर्तन करण्याच्या दिशेने नेऊ शकते.**१२** या जातीमुळे माणूस पशु झाला.मानवतेला तो मुकला जात आहे.
**लिंगभेद** -आजही स्त्रीला दुय्यम स्थान देण्याचा प्रयत्न सुरू आहे. या लिंगभेदामुळे समतेच्या मूल्याची पायपल्ली होताना दिसत आहे.तिला अबला, कमजोर समजून तिची अवहेलना करण्यात येत आहे**.**

**आर्थिक विषमता** -आर्थिक विषमतेमुळे गरीब अधिक गरीब झाला श्रीमंत आधी श्रीमंत होत आहे.रोजगाराच्या संधी शिक्षणाच्या संधी यामध्ये बरीच तफावत आहे.त्यामध्ये फार मोठी असमानता दृष्टीस पडते हीच असमानता समतेच्या मार्गात अडथळा निर्माण करीत आहे.

**राजकीय कारणे**- विषमतेचे परिणाम किती घातक असतात हे सांगण्याची गरज आज राहीली नाही.मोजक्या वर्गाकडे सत्ता आज बळकवली जात आहे. जात-पात पाहून सत्तेचे राजकारण करण्यात येत आहे.त्यामुळे समाजात तणाव निर्माण होतो.हिंसक वृत्ती वाढीस लागते आहे.माणसाच्या मनातही असंतोषाची भावना निर्माण होत आहे.नेपाळचे उदाहरण आज आपल्यासमोर आहे .तथागत गौतम बुद्धांनी या विषमतेची मूळ कारण **लोभ** व **मोह** सांगितला आहे.ते म्हणतात "**लोभ व तृष्णा याच्या आहारी जाऊ नका**." लोभातून दुःख उत्पन्न होते,लोभातून भय निर्माण होते.**१३** त्यावर उपाय म्हणून तथागत गौतम बुद्धांनी समतेचा मार्ग सांगितला.त्यांनी सांगितले ला मार्ग अंतर्मनात संतुलन साधणारा आहे. ते म्हणतात,

**अनवस्सुतचित्तस्स अनन्वाहतचेतसो**
**पुञ्ञपापपहीणस्स नत्थि जागतो भयं! १४**

**अर्थ** - ज्याच्या मनात राग नाही ज्याच्या मनात द्वेष नाही,ज्याच्या मनात तृष्णा नाही,जो पाप पुण्याच्याही पुढे केला आहे,त्या जागृत पुरुषाला जगात कसलैच भय नसते.अर्थात व्यक्ती मनोभुमिकेतून समभाव स्वीकारते.तेव्हाच विषमता ही आपोआप नष्ट पावते.

**वर्तमान काळात समितीची गरज:**

**समता** हे कोणतेही तत्वे नाही ते एक लोकशाही समाजाचे महत्त्वाचे मूल्य आहे.आज समाज विज्ञान,तंत्रज्ञान औद्योगीकरण,जागतिकीकरण डिजिलायझेशन कडे वाटचाल करीत आहे.परंतु या सर्व क्षेत्रात असमानता विविध रूपांनी दिसत आहे.अशा या परिस्थितीत समतेची फार आवश्यकता आहे.समता ही माणसाच्या बौद्धिक,नैतिक व भावनिक गोष्टीची जोडलेली आहे.त्यामुळे मानवी हक्काच्या अंमलबजावणीसाठी,सामाजिक शांततेसाठी,लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी,स्त्री पुरुष समानते करिता, आर्थिक विकास साध्य करण्यासाठी, सामाजिक न्यायाची अंमलबजावणी करण्यासाठी,समता फार आवश्यक आहे.जर वरील बाबी मध्ये समता नसल्यास सामाजिक असंतोष वाढेल न्यायप्रणालीवर लोकांचा विश्वास बसणार नाही,**बंधुता** तुटेल,लोकशाहीचा पाया कमकुवत होणार,विषमता वाढीस

Volume 5, Issue 4, Oct-Dec 2025 ID: IJCRTA000214 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

लागणार,सामाजिक तणाव वाढेल.समता ही केवळ कागदावर नको. ती प्रत्यक्षात अंमलात आणायला हवी.तरच राष्ट्राची उन्नती होणार.ही उन्नती तथागत गौतम बुद्धांनी सांगितलेल्या समता या तत्त्वाने होणार ही निश्चितच.

**निष्कर्ष:**

**समता ही मानवी विकासाची गुरुकिल्ली आहे**.जिथ समता आली तिथं **स्वातंत्र्य** आले जिथं स्वातंत्र्य आले तिथं **बंधुता** आली आणि जिथं बंधुता आली तिथं **न्याय** येतोच.कारण त्यांच्याशिवाय समता ही असु शकणार नाही.त्यांच्या शिवाय ती अपुर्णच आहे.तथागत गौतम बुद्धांनी दिलेला समतेचा संदेश हा केवळ एका जातीपुर्ता दिला नाही तर सर्व मानव जाती करीता दिलेला संदेश आहे.समता या मूल्याला आदर्श न मानता तिचा व्यवहारत उपयोग होणे महत्वाचे आहे.तरच तिला अर्थ प्राप्त होईल.समता ही नैतिक गरज आहे.तथागतांनी दिलेला समतेचा संदेश हा आजही फार महत्त्वाचा आहे.मानवी समाजात समता नसेल तर मानवाचे अस्तित्व धोक्यात येयाला वेळ लागणार नाही.त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने समतेच्या मूल्याचा स्वीकार करणे आवश्यक आहे.तेव्हाच मानवी समाज सुखी आणि समृद्ध होईल.समता प्रस्तावित होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न करणे काळाची गरज आहे.

**संदर्भसूची:**


१) कोसंबी धर्मानंद,(२०१९).सुत्तनिपात.औरंगाबाद:-कौशल्य प्रकाशन.पा नं.२०९
२) अंभोरे बाळासाहेब,(२०१९).पालि साहित्याचा परिचय,नितीतत्वे व आधारस्तंभ.औरंगाबाद:-एहिपस्सिको प्रकाशन.पा.न.१४५
३) वाड विजय,(२००९). मराठी विश्वकोश खंड -१८.मुंबई-विश्वकोश निर्मिती मंडळ.पा न.६४७
४) https://marathi.indiatime.com
५) विमलकीर्ती,(२०१९),थेर गाथा,नी दिल्ली:सम्यक प्रकाशन.पा नं-२८८
६) कित्ता ,२८९.
७) आंबेडकर डॉ बाबासाहेब.(१९९७),भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म,चंद्रपुर:धम्म सासन विश्व विद्यापीठ.पा.न.१५९
८) विमलकिर्ती,(२०२४),थेरी गाथा,नई दिल्ली: सम्यक प्रकाशन पा.नं.१६२.
९) पाटील निरंजन,(२०१२), बुध्दकालीन व आधुनिक लोकशाही गणराज्य, मुंबई: सम्यक व्हिजन,पा.नं.७८
१०) कित्ता पां.नं.७८
११) ११) आंबेडकर बि.आर,(२०१५), जातिव्यवस्थेचे निर्मूलन, मुंबई: महाराष्ट्र शासन.पा.नं.३९
१२) कित्ता.पा.नं.५३
१३) आंबेडकर बाबासाहेब,(१९९७), भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म,चंद्रपुर:धम्म सासन विश्व विद्यापीठ पा.नं २७३
१४) पिसाळ.पी.बी.(२०१२),धम्मपद, मुंबई:पालि पाठ संस्था.पा.नं.२३